# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२१६५९४** **E-Mail** : arcollegesectiongug48@gmail.com

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)


क्र./ गो.वि./महा.वि /2014/२०१५
दिनांक 20/११/२०१५

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय :– प्राचार्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत.**

संदर्भ :– शिक्षण संचालक(उ.शि), पूणे यांचे पत्र क्र. अमवि/२०१५/प्राचार्यरिक्तपदे/मवि–२,
दि. १०.११.२०१५

मा. महोदय,

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे विद्यापीठाकडून वारंवार सूचना देऊनही भरल्या जात नाहीत. आणि ती रिक्त आहेत. प्राचार्यांच्या रिक्त पदाबाबत शासन सतरावरुन वारंवार विद्यापीठास विचारणा होत असून या बाबतीत तारांकीत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

उपरोक्त बाबींचा विचार करुन आपणांस विनंती करण्यात येते की, प्राचार्य पद भरतीबाबत तातडीने कार्यवाही करुन अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा की, जेणेकरुन महाविद्यालयांच्या कार्यालयीन कामकाजाची गैरसोय होणार नाही.

कळावे,

(डॉ.एस.एम.रोकडे)
**संचालक(प्रभारी)**
**महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्रे :– वरिलप्रमाणे

-२९४५ 18/11/15

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

फोन नं ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. ०२०/२६११११५३

क्रमांक-अमवि/२०१५/प्राचार्यरिक्तपदे /मवि-२ दि.१०/११/२०१५

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषि विदयापीठे, महाराष्ट्र राज्य.
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

7953 17/11/15

**विषय - प्राचार्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत.**

**संदर्भ - १. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक नियुक्ती-२०११/प्र.क्र.३४४/ ११/मशि-५, दिनांक १५/३/२०१२**
**२. संचालनालयाचे पत्रक्रमांक अमवि/२०१३/प्राचार्यपदे/मवि-२ व ३/३७११, दिनांक १४/७/२०१३**
**३. संचालनालयाचे पत्रक्रमांक एनजीसी/परिपत्रक/मवि-२-३/४५८७, दिनांक २१/५/२०१४**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णय व पत्रांन्वये शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना अनुदानित महाविदयालयांमधील प्राचार्याची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. तरीही प्राचार्यांची पदे रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

या विषयाबाबत अधिवेशनामध्ये वारंवार तारांकित प्रश्न, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, अतारांकित प्रश्न उपस्थित होतात. तरी आपल्या विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालयांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त असल्यास ती तात्काळ भरण्यात यावीत.

विभागीय सहसंचालक यांनी शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विद्यापीठांनी कायम विना अनुदानित महाविदयालयांमधील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत संस्थाचालकास सूचना दयाव्यात. प्राचार्य पद नियमित भरणे आवश्यक आहे याची सकारण जाणीव करुन दयावी.

दर महिन्याला प्राचार्यांच्या भरलेल्या व रिक्त पदांचा आढावा घेण्यात यावा व त्याची एक प्रत संचालनालयास सादर करावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

प्रत, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.